मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरीतील पदपथ अतिक्रमणमुक्तीकडे; आयुक्त 'ॲक्शन मोड'वर...

## आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी धडक मोहीम हाती घेतली, वाकड परिसरातील 33 अनधिकृत पत्राशेडवर हातोडा चालवला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मोहीम तीव्र केली जाणार आहे. पादचाऱ्यांना मोकळा आणि सुरक्षित मार्ग मिळावा यासाठी 'अतिक्रमणमुक्त पदपथ' मोहिमेला गती देण्यात येत असून, त्याकरिता क्षेत्रीय कार्यालय स्तरावर विशेष पथके कार्यरत राहणार असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.




अनधिकृत जाहिराती, अतिक्रमणे, परवानगीशिवाय सुरू असलेल्या बांधकामासंबंधी आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी प्रमुख अधिकारी व सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांबरोबर आढावा बैठक घेतली. त्यात त्यांनी प्रशासनाला विविध सूचना दिल्या. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, उपायुक्त सचिन पवार, डॉ. प्रदीप ठेंगल, अण्णा बोदडे, सहायक आयुक्त किरणकुमार मोरे, अमित पंडित, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे आदी बैठकीला उपस्थित होते.

शहरातील पदपथ अनधिकृत फेरीवाले, विक्रेत्यांनी गिळंकृत केले आहेत. नागरिकांना पदपथावरून चालणे मुश्कील झाले आहे. त्यांना सेवा रस्त्याने चालावे लागते. या पार्श्वभूमीवर, डॉ. सूर्यवंशी यांनी पदपथ अतिक्रमणमुक्तीचा निर्धार केला असून, त्यासाठी विशेष पथके तैनात केली जाणार आहेत.

अशा बांधकामांत नागरिकांनी सदनिका खरेदी करू नये. तसेच, खरेदी करीत असलेले घर किंवा सदनिकेला अधिकृत बांधकाम परवानगी असल्याची खात्री करावी, असे आवाहन आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी नागरिकांना केले आहे.

अतिक्रमण हटविण्यासाठी १६ जेसीबीचा वापर करण्यात आला. शहरातील वाढत्या अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवून नागरिकांना सुरक्षित आणि नियोजनबद्ध शहरी सुविधा उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. शहरातील कोणतेही अनधिकृत बांधकाम सहन केले जाणार नाही. त्यामुळे नागरिकांनी नियमांचे पालन करूनच बांधकाम करावे, अन्यथा अशा प्रकारची कठोर कारवाई करण्यात येईल. या परिसरातील कारवाई गुरुवारी देखील सुरू राहणार असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

### वाकडमधील ३३ पत्राशेडवर हातोडा

» महापालिकेच्या 'ड' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत जगताप डेअरी ते वाकड परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभारण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली. ३३ पत्राशेडवर हातोडा मारण्यात आला. वाकड परिसरातील अनधिकृत १०४ मालमत्तांची यादी तयार करण्यात आली होती. न्यायालयीन स्थगिती, अटींसह स्थगिती असलेल्या मालमत्ता वगळता उर्वरित सर्व अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. धडक कारवाई पथक, बीट निरीक्षक असे १५० अधिकारी व कर्मचारी, १०४ पोलीस कर्मचारी आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे ६० जवान उपस्थित होते.

### अनधिकृत जाहिरातदारांना नोटीस

» शहरातील भिंती, दूरध्वनी खांब आणि महावितरणच्या डीपीवर लावण्यात आलेले अनधिकृत जाहिरातफलक तत्काळ हटविण्यात येणार आहेत. अशा फलकांवरील मोबाइल क्रमांकांवर संपर्क साधून संबंधितांना नोटीस बजावण्याची कारवाई करण्याचे आदेशही आयुक्तांनी दिले आहेत.

# " केवळ सुभाषित नको, त्यानुसार उत्तम सुविधा द्या!": परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

## वल्लभनगर बसस्थानकाची परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांची पाहणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

दमून-भागून आलेल्या चालक व वाहकांना योग्य विश्रांती मिळावी यासाठी त्यांच्या विश्रांतीगृहांमध्ये उत्तम सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. स्वच्छतागृहे टापटीप व स्वच्छ ठेवावीत, कर्मचाऱ्यांसाठी पिण्याचे शुद्ध पाणी तसेच अंघोळीसाठी गरम पाण्याची सोय करावी—अशा घरगुती सुविधांची निर्मिती करावी, असे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी स्थानिक एसटी प्रशासनाला दिले.



वल्लभनगर बसस्थानकाला त्यांनी भेट दिली असता ते बोलत होते. "चालक-वाहक हा एसटीचा कणा आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कष्ट करून तो दररोज राज्यातील सुमारे ५० ते ५५ लाख प्रवाशांना सुरक्षित सेवा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो. या कर्मचाऱ्यांना कर्तव्य पूर्ण झाल्यानंतर घरच्यासारख्या सुविधा मिळाल्यास ते अधिक उत्साहाने सेवा बजावतील," असा मोलाचा सल्ला मंत्री सरनाईक यांनी दिला.

बसस्थानकाची पाहणी करताना त्यांनी अनेक वर्षे बंद असलेले व्यापारी गाळे महिला बचत गटांना व होतकरू उद्योजक तरुणांना अत्यल्प भाड्यात उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. यामुळे एसटी महामंडळाचा महसूल वाढेल तसेच प्रवासी व कर्मचाऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा मिळतील, असे त्यांनी नमूद केले.

### उपहारगृहांत ४० रुपयांत चहा-नाश्ता

» महामार्गांवरील हॉटेल-मोटेलप्रमाणेच एसटी बसस्थानकांवरील उपहारगृहांमध्येही सर्व प्रवाशांना ४० रुपयांत चहा-नाश्ता देण्याची योजना १ जूनपासून सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी केली. या पाहणीदरम्यान खासदार श्रीरंग बारणे, शिवसेना नेत्या सुलभा उबाळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे तसेच एसटीचे अधिकारी उपस्थित होते.

# दिघीतील सीएमई भिंतीलगत बाधित 14 कुटुंबांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी..!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश; न्यायासाठी प्रतिक्षेत बाधित कुटुंबियांकडून आनंद साजरा

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिघी येथील COLLEGE OF MILITARY ENGINEERING (CME) भिंतीलगत रस्त्याच्या कामामुळे बाधित झालेल्या १४ कुटुंबांच्या पुनर्वसनाचा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा, प्रशासनाशी सातत्याने केलेला संवाद आणि समन्वय यामुळे ही प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आवश्यक सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्यानंतर नुकतेच उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या हस्ते बाधित कुटुंबांना घरांबाबतची अधिकृत पत्रे वितरित करण्यात आली. करारनामा पूर्ण झाल्यानंतर लवकरच या कुटुंबांना त्यांच्या हक्काच्या घरांचा प्रत्यक्ष ताबा मिळणार आहे.

अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या प्रतीक्षेला अखेर पूर्णविराम मिळाल्याने बाधित कुटुंबांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. घर मिळणार असल्याच्या आनंदात काही कुटुंबीयांनी एकमेकांना पेढा भरवून आनंद व्यक्त केला. या संपूर्ण प्रक्रियेत आमदार महेश लांडगे यांनी घेतलेली पुढाकाराची भूमिका निर्णायक ठरल्याचे प्रशासन स्तरावरूनही मान्य करण्यात आले आहे. "विकासासोबतच कोणत्याही नागरिकावर अन्याय होऊ नये, प्रत्येकाला न्याय मिळाला पाहिजे," या भूमिकेतून त्यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचे सांगितले जात आहे.

यावेळी माजी नगरसेवक विकास डोळस उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड शहराच्या शाश्वत विकासासोबतच मानवी संवेदनशीलता जपत बाधित नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणे हीच आपली प्राथमिकता असल्याचेही या निमित्ताने अधोरेखित झाले. दरम्यान, या निर्णयामुळे दिघी परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, बाधित कुटुंबांनी आमदार महेश लांडगे यांचे विशेष आभार मानले आहेत.

> "विकासाची कामे करताना कोणताही नागरिक बेघर किंवा बाधित राहू नये, हीच आमची ठाम भूमिका आहे. दिघी येथील सीएमई भिंतीलगत बाधित १४ कुटुंबांचे पुनर्वसन हा केवळ प्रशासकीय निर्णय नसून सामाजिक न्यायाचा विजय आहे. प्रशासनाशी सातत्यपूर्ण समन्वय साधत या कुटुंबांना त्यांचे हक्काचे घर मिळवून देणे हे आमचे कर्तव्य होते आणि ते पूर्णत्वास नेण्यात आम्हाला समाधान आहे."
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

> "अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर या कुटुंबांना स्वतःचे घर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, ही अत्यंत समाधानाची बाब आहे. स्थानिक पातळीवर सातत्याने पाठपुरावा आणि प्रशासनाशी समन्वय साधल्यामुळे हा प्रश्न सकारात्मकरीत्या सुटला. नागरिकांच्या मूलभूत हक्कांसाठी आम्ही सदैव तत्पर आहोत."
>
> - विकास डोळस, माजी नगरसेवक, भाजपा.

# थेरगाव येथे होणाऱ्या भव्य कॅन्सर हॉस्पिटलचा सभापती अभिषेक बारणे यांनी घेतला आढावा

## परिसरातील 6 हजार 945 चौ. मी. अतिक्रमण तसेच अनधिकृत बांधकाम असलेल्या 33 पत्रा शेडवर धडक कारवाई करण्यात आली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकातील रुग्णांना कर्करोगावर सुलभ आणि परवडणाऱ्या दरात उपचार उपलब्ध करून देण्यासाठी थेरगाव येथे महानगरपालिकेच्या वतीने भव्य कॅन्सर हॉस्पिटल उभारण्यात येत आहे. या हॉस्पिटलच्या उभारणीचा आणि विविध सुविधांचा आढावा घेण्यासाठी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आज, ३० एप्रिल रोजी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष कामाची पाहणी केली.



या पाहणी दौऱ्यादरम्यान अभिषेक बारणे यांनी हॉस्पिटल परिसरातील पार्किंग सुविधा, सुरक्षा व्यवस्था, ऑक्सिजन आणि पाणी पुरवठा यंत्रणा, तसेच स्वच्छतेच्या नियोजनाबाबत अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. रुग्णालयात पुरवल्या जाणाऱ्या संभाव्य आरोग्य सेवांची माहिती घेत असताना त्यांनी कामाचा दर्जा आणि गती याबाबत प्रशासनाला आवश्यक सूचनाही केल्या.

यावेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र फिरके, डॉ. मुसलगी, डॉ. सोनेकर, डॉ. कुलकर्णी यांसह पालिकेचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

हे रुग्णालय जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असणार आहे. यामध्ये लिनियर ॲक्सिलरेटर, ब्रॅकीथेरपी युनिट्स आणि पीईटी-सीटी स्कॅनर यांसारखी महागडी यंत्रसामग्री बसवण्यात येणार आहे. येथे प्रामुख्याने स्तनाचा, फुफ्फुसाचा, कोलोरेक्टल, प्रोस्टेट आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगावर विशेष उपचार केले जातील. तसेच केमोथेरपी, रेडिएशन थेरपी, शस्त्रक्रिया, समुपदेशन आणि पुनर्वसन या सेवा एकाच छताखाली मिळतील.

विशेष म्हणजे, येथील उपचारांचे शुल्क 'महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना' आणि केंद्र सरकारच्या आरोग्य योजनांशी सुसंगत ठेवले जाणार असल्याने गरिबांसाठी हे उपचार अत्यंत स्वस्त किंवा मोफत ठरणार आहेत. या दौऱ्याचे औचित्य साधून अभिषेक बारणे यांच्या हस्ते थेरगाव हॉस्पिटलमध्ये अनेक वर्षे आपली निष्कलंक सेवा देणारे ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र फिरके यांचा सेवानिवृत्तीनिमित्त विशेष गौरव करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. थेरगावमधील या नवीन प्रकल्पामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कर्करोग रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

> "कर्करोगासारख्या गंभीर आजाराचा उपचार हा अत्यंत खर्चिक असतो, जो सामान्यांच्या आवाक्याबाहेर जातो. त्यामुळेच थेरगाव येथे महानगरपालिकेच्या वतीने हे अत्याधुनिक कॅन्सर हॉस्पिटल उभारले जात आहे. या रुग्णालयामध्ये आम्ही लिनियर ॲक्सिलरेटर आणि पीईटी-सीटी स्कॅनर यांसारख्या जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देत आहोत. महत्त्वाचे म्हणजे, हे उपचार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेशी जोडले जाणार असल्याने गोरगरीब रुग्णांना येथे मोफत किंवा अत्यंत अल्प दरात सेवा मिळेल. शहरातील एकाही रुग्णाला पैशाअभावी उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, हेच आमचे उद्दिष्ट आहे."
>
> - अभिषेक बारणे, सभापती, स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# कोरेगाव पार्कमध्ये पूररेषेजवळ राडारोडा; महापालिकेची नोटीस

## भराव तातडीने हटवण्याचे आदेश; नियमभंग केल्यास कारवाईचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका प्रशासना तील बांधकाम अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन जागेची पाहणी केली. तसेच, संबंधितांना नोटीस पाठविण्यात आली आहे. त्या नोटिशीद्वारे पूर नियंत्रणरेषेत भराव टाकणाऱ्या बिल्डरला आणि जागामालकाला टाकलेला भराव तातडीने स्वतःहून काढून घेण्याच्या नोटिशीमध्ये उल्लेख केला आहे.

नदीपात्र परिसरात टाकल्या जाणाऱ्या राडारोड्याबद्दल जागेची पाहणी केली आहे. भाऊ काचीवस्तीतील पूर नियंत्रणरेषेच्या परिसरात राडारोडा आहे. संबंधितांना नोटीस पाठविण्यात आली आहे. राडारोडा न हटविल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल, असे महापालिका कनिष्ठ अभियंता नितीन चांदणे यांनी सांगितले.




### रहिवाशांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न

**» एसएसपीएमएस मैदानालगत असलेल्या या भागात मोठ्या प्रमाणात राडारोडा टाकण्यात आला असून ढिगांची उंची घरांच्या वर गेली आहे. त्यामुळे सुमारे ४० कुटुंबांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाळ्यात हा भराव पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडवू शकतो, ज्यामुळे पूरस्थिती गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून प्रशासनाकडून तातडीच्या उपाययोजनांची अपेक्षा व्यक्त होत आहे.**

पुणे आरटीओ रस्ता परिसरातील एसएसपीएमएस मैदानालगत असलेल्या भाऊ काचीवस्तीजवळील रिकाम्या जागेत माती आणि राडारोडा टाकला जात होता. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षतोडही केली आहे. राडारोड्याच्या ढिगांची उंची जवळ असलेल्या घरांच्या वर गेल्यामुळे रहिवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

एसएसपीएमएस मैदानाजवळ ब्रिटीशकाळापासून भाऊ काचीवस्ती आहे. या ठिकाणी सध्या सुमारे चाळीस कुटुंबे वास्तव्यास आहेत. मात्र, खासगी जागेचा मालक आणि बांधकाम व्यावसायिक यांच्या संगनमताने पूर नियंत्रणरेषेच्या परिसरात केमिकलयुक्त माती आणि राडारोडा टाकून भराव टाकला जात होता.

संबंधित बिल्डर व जागामालकाला तातडीने भराव हटविण्याची नोटीस देण्यात आली आहे. भराव न काढल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला. या प्रकारामुळे पावसाळ्यात पूरस्थिती गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भराव टाकल्याने पावसाळ्यात या भागात पूरस्थिती गंभीर होण्याचा धोका आहे. परिसरात वृक्षतोडही केली आहे. वृक्ष अधिकाऱ्यांकडून संबंधितांना नोटीस बजावली आहे. नदीपात्र परिसरात टाकल्या जाणाऱ्या राडारोड्याबद्दल जागेची पाहणी केली आहे. भाऊ काचीवस्तीतील पूर नियंत्रणरेषेच्या परिसरात राडारोडा आहे. संबंधितांना नोटीस पाठवून राडारोडा हटविण्यात येईल, असे चांदणे यांनी सांगितले.

### पूर नियंत्रणरेषेत बेकायदेशीर भराव

**» पुण्यातील भाऊ काचीवस्ती परिसरात पूर नियंत्रणरेषेत माती व राडारोडा टाकून बेकायदेशीर भराव केल्याचे उघड झाले आहे. महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून संबंधित बिल्डर व जागामालकाला नोटीस बजावली आहे. नोटिशीत तातडीने भराव स्वतःहून हटविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.**

### वृक्षतोड व कारवाईचा इशारा

**» भराव टाकताना परिसरातील मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात आल्याचेही समोर आले आहे. याप्रकरणी वृक्ष प्राधिकरणाकडून स्वतंत्र नोटीस देण्यात आली आहे. नदीपात्र परिसरातील राडारोडा हटविण्याचे आदेश देण्यात आले असून कारवाईची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती कनिष्ठ अभियंता नितीन चांदणे यांनी दिली. संबंधितांनी आदेश पाळले नाहीत, तर पुढील कायदेशीर कारवाई होणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.**

---

# पोलीस, महापालिकेकडून 'ड्रग मुक्त प्रभाग मोहीम'; पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्या हस्ते सुरुवात

## अमली पदार्थ तस्करीच्या मुळापर्यंत जाण्याचे आदेश तपास पथकांना देण्यात आले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

अमली पदार्थांच्या व्यसनांचा विळखा आणि तरुणांचे प्रबोधन करण्यासाठी पुणे महानगरपालिका आणि पुणे पोलिसांकडून 'ड्रगमुक्त प्रभाग – ड्रगमुक्त पुणे ' ही मोहीम सुरू करण्यात आली. या मोहिमेला पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्या हस्ते बुधवारी सुरुवात करण्यात आली.

या निमित्त पद्मावती येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सभागृह येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पोलीस आयुक्त अमितेशकुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त पंकज देशमुख, राजेश बनसोडे, मनोज पाटील, उपायुक्त मिलिंद मोहिते, स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले या वेळी उपस्थित होते.




या वेळी पोलीस आयुक्त अमितेशकुमार म्हणाले, 'अमली पदार्थ तस्करी करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांकडून कडक कारवाई करण्यात येत आहे. फक्त गुन्हा दाखल करून अमली पदार्थ तस्करीची समस्या सुटणार नाही. अमली पदार्थ तस्करीच्या मुळापर्यंत जाण्याचे आदेश तपास पथकांना देण्यात आले आहे. अमली पदार्थ पुरवठादारांना अटक करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली जाणार आहे.'

'शहरातील कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी लोकप्रतिनिधींशी संवाद साधण्यास सुरुवात केली आहे. अमली पदार्थ विक्री करणारे, तसेच तस्करांची माहिती नागरिकांनी कळवावी. पोलिसांकडून त्वरित कारवाई करण्यात येईल. तक्रारदाराचे नावही गोपनीय ठेवण्यात येईल,' असे त्यांनी नमूद केले. श्रीनाथ भिमाले यांनी या वेळी मनोगत व्यक्त केले. या मोहिमेस सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. 'महानगरपालिकेचे सर्व नगरसेवक, कार्यकर्ते नागरिकांनी 'ड्रग फ्री पुणे' हे ॲप मोबाइलमध्ये समाविष्ट करावे. या ॲपच्या माध्यमातून नागरिकांनी त्वरित तक्रार द्यावी,' असे आवाहन भिमाले यांनी केले. उपायुक्त मोहिते यांनी प्रास्ताविक केले.

### 'ड्रगमुक्त पुणे' मोहिमेला प्रारंभ

**» पुणे महानगरपालिका आणि पुणे पोलिसांच्या संयुक्त विद्यमाने 'ड्रगमुक्त प्रभाग – ड्रगमुक्त पुणे' मोहिमेला सुरुवात करण्यात आली. पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन झाले. अमली पदार्थ तस्करीविरोधात कडक कारवाई करताना केवळ गुन्हे दाखल न करता त्याच्या मुळापर्यंत पोहोचण्याचे आदेश देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांनी 'ड्रग फ्री पुणे' ॲपद्वारे तक्रारी नोंदवाव्यात, तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असेही त्यांनी सांगितले. शहर ड्रगमुक्त करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.**

# पुण्यात गॅस गळतीची घटना ! अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला

## पुण्यातील मार्केट यार्डातील गंगाधाम-बिबवेवाडी रस्त्यावर मध्यरात्री मोठा अनर्थ होता होता टळला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील मार्केट यार्डातील गंगाधाम-बिबवेवाडी रस्त्यावर मध्यरात्री मोठा अनर्थ होता होता टळला आहे. याठिकणी असलेल्या एका रासायनिक कंपनीतून मध्यरात्री गॅस गळती झाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी त्वरीत घटनास्थळी धाव घेऊन गॅस गळती रोखल्याने अनर्थ टळला.

रासायनिक कंपनीतून गॅस गळती झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना श्वसनाचा झाल्याने त्यांना तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेत अग्निशमन दलाचे एक अधिकारी आणि जवानाला त्रास झाला. त्यांनाही रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

गंगाधाम रस्त्यावर आईमाता मंदिरासमोर ही रासायनिक कंपनी आहे. या कंपनीतून मध्यरात्री मोठ्या प्रमाणावर गॅस गळती सुरू झाली. गॅस गळती झाल्यानंतर परिसरातील २४ नागरिकांना त्रास जाणवू लागला. डोळे चुरचुरणे, श्वसनाचा त्रास जाणवल्याच्या तक्रारी करण्यात आला.

गॅस गळतीची घटना समजल्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. सुरक्षाविषयक उपकरणे परिधान करुन आधिकारी आणि जवान कंपनीत शिरले. त्यांनी तातडीने गॅस गळती रोखली.

नागरिकांना त्रास जाणवू लागल्याची माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन दलाचे अधिकारी आणि जवानांनी तातडीने नागरिकांना ससून रुग्णालयात दाखल रुग्णवाहिकेतून दाखल केले. गॅस गळतीमुळे २४ नागरिकांना त्रास झाला. अग्निशमन दलाचे एक अधिकारी आणि जवान यांनाही त्रास झाला. त्यांना ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले.

सुदैवाने या घटनेत कोणी गंभीर जखमी झाले नाही', अशी माहिती अग्निशमन दलाचे मुख्य अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांनी दिली. अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पाच अधिकारी आणि ३० जवान मदतकार्यात सहभागी झाले होते. परिणामी आता परिस्थिती नियंत्रणात आहे. मात्र, हि गॅस गळती नेमकी कशी झाली हे अद्याप कळू शकलं नाही.




### अग्निशमन दलाची तत्पर कारवाई

» घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. सुरक्षाविषयक उपकरणे परिधान करून अधिकारी व जवानांनी कंपनीत प्रवेश करत गॅस गळतीवर नियंत्रण मिळवले. या कारवाईदरम्यान एका अधिकाऱ्यासह एका जवानालाही त्रास झाल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पाच अधिकारी व ३० जवानांनी ही मोहीम यशस्वीपणे पार पाडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

### मध्यरात्री गॅस गळती

» पुण्यातील मार्केट यार्ड परिसरातील गंगाधाम-बिबवेवाडी रस्त्यावर मध्यरात्री एका रासायनिक कंपनीतून गॅस गळती झाल्याची घटना घडली. गंगाधाम रस्त्यावर आईमाता मंदिरासमोर असलेल्या या कंपनीतून मोठ्या प्रमाणावर गॅस बाहेर पडू लागल्याने परिसरात खळबळ उडाली. डोळ्यांची जळजळ, श्वसनाचा त्रास अशा तक्रारींमुळे २४ नागरिकांना तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. अचानक झालेल्या या घटनेमुळे परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

> “गंगाधाम रस्त्यावरील आईमाता मंदिराजवळील रासायनिक कंपनीतून गॅस गळती झाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी त्वरीत गॅस गळती रोखल्याने अनर्थ टळला. या घटनेत २४नागरिकाना त्रास झाला. त्यांना तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर ससून रुग्णालयात उपचार करण्यात आले.
>
> - देवेंद्र पोटफोडे, मुख्य अग्निशमन अधिकारी

# पुणे-सातारा महामार्गावरील प्रवास होणार सुसाट, नवीन सहापदरी 'ट्विन-ट्यूब' बोगद्याची चाचणी सुरू...

## खंबाटकी घाटातील 'एस' वळणापासून सुटका; प्रवाशांचा 15 मिनिटांचा वेळ वाचणार


**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-सातारा महामार्गावरून (एनएच ४८) प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी एक अत्यंत दिलासादायक बातमी आहे. खंबाटकी घाटातील जीवघेणी वाहतूक कोंडी आणि अपघातांचे सत्र कायमचे संपवण्यासाठी बांधण्यात आलेल्या नवीन सहापदरी 'ट्विन-ट्यूब' बोगद्याची चाचणी नुकतीच सुरू करण्यात आली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे प्रवाशांची धोकादायक वळणांपासून सुटका होणार असून प्रवासाचा वेळही वाचणार आहे.

खंबाटकी घाट हा त्याच्या तीव्र उतारासाठी आणि अवघड वळणांसाठी ओळखला जातो. विशेषतः येथील 'एस' वळणावर आजवर अनेक भीषण अपघात झाले आहेत. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून या आधुनिक बोगद्याची निर्मिती केली आहे. सध्या या प्रकल्पाचे सुमारे ८६ टक्के काम पूर्ण झाले असून, २०२६ च्या पहिल्या सहामाहीत हा मार्ग सर्वसामान्यांसाठी पूर्णपणे खुला होण्याची शक्यता आहे.

सध्या चाचणीसाठी बोगद्याची एक बाजू खुली करण्यात आली असून, या प्रकल्पात प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. दोन्ही बाजूंनी प्रत्येकी तीन पदरी रस्ते असल्याने वाहतूक वेगवान होईल.

बोगद्यात उच्च दर्जाची प्रकाश व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे आणि रिफ्लेक्टर्स बसवण्यात आले आहेत. कोणत्याही दुर्घटनेला तोंड देण्यासाठी आधुनिक अग्निशमन उपकरणे आणि आपत्कालीन एक्झिट मार्ग तयार करण्यात आले आहेत.



### महत्त्वाचा वाहतूक दुवानासाडी

» कनेक्टिव्हिटी : मुंबई-पुणे-बेंगळुरू या महत्त्वाच्या कॉरिडॉरचा हा बोगदा अविभाज्य भाग आहे.

» पर्यटनाला चालना : महाबळेश्वर, पाचगणी, कोल्हापूर आणि बेळगावकडे जाणाऱ्या पर्यटकांसाठी हा मार्ग अत्यंत कळीचा ठरणार आहे.

» आर्थिक फायदा : मालवाहतूक करणाऱ्या वाहनांचा वेळ वाचल्याने रसद पुरवठा अधिक वेगवान होईल.